सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

## राज्य सेवा मुख्य परीक्षा - २०१८

**अधिसूचना क्रमांक : एनओटी-३६१८/सीआर-३१/२०१८/तीन** **जाहिरात क्रमांक : ३२/२०१८**

जाहिरात क्रमांक ७६/२०१७, दिनांक २९ डिसेंबर, २०१७ नुसार राज्य शासनाच्या सेवेतील विविध पदांवरील / सेवांमधील भरतीकरीता आयोगामार्फत दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा पूर्व परीक्षा - २०१८ च्या दिनांक २८ जून, २०१८ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निकालाआधारे, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची **राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१८, दिनांक १८, १९ व २० ऑगस्ट, २०१८ रोजी औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे या जिल्हाकेंद्रावर घेण्यात येईल.**

**२.** प्रस्तुत राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१८ मधून भरण्यात येणा-या एकूण १३६ पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| **(१) उप जिल्हाधिकारी, गट-अ (एकूण २० पदे)** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** | **वि.मा.प्र.** | **एकूण मागासवर्गीय** | **खुला** | **एकूण पदे** |
| पदसंख्या | ५ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ५ | १५ | २० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ३ | १० | १३ |
| महिला | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ४ | ६ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(२) पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट-अ (एकूण २ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १* | -- | -- | -- | -- | -- | १* | -- | २ | -- | २ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | २ | -- | २ |
| **(३) सहायक राज्यकर आयुक्त, गट-अ (एकूण १२ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | १ | -- | १ | -- | १ | -- | ४ | ८ | १२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | १ | -- | १ | -- | १ | -- | ४ | ६ | १० |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| **(४) उप मुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी, गट-अ (एकूण ६ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | ३ | ३ | ६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | ३ | २ | ५ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(५) सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ, (एकूण ८ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | २ | -- | १ | -- | -- | १ | -- | ४ | ४ | ८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | १ | -- | -- | १ | -- | २ | ३ | ५ |
| महिला | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| खेळाडू | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| **(६) उद्योग उपसंचालक, तांत्रिक, गट-अ (एकूण २ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(७) तहसिलदार, गट-अ (एकूण ६ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | ३ | ३ | ६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ | ४ |
| महिला | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| **(८) उपशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) (एकूण २५ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १+८* | १+१* | -- | ३* | १+४* | -- | १ | -- | २० | ५ | २५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५ | २ | -- | २ | ३ | -- | १ | -- | १३ | ३ | १६ |
| महिला | ३ | -- | -- | १ | २ | -- | -- | -- | ६ | २ | ८ |
| खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| दिव्यांग | एकूण पद १ - श्रवणशक्तीतील दोष - १ पद | | | | | | | | | | |
| **(९) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब (एकूण ४ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | १* | -- | -- | -- | -- | -- | १ | ३ | ४ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | ३ | ४ |
| **(१०) कक्ष अधिकारी, गट-ब (एकूण २६ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | २+५* | -- | १ | -- | १+१* | ५+२* | -- | १७ | ९ | २६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | ५ | -- | १ | -- | १ | ५ | -- | १२ | ६ | १८ |
| महिला | -- | २ | -- | -- | -- | १ | २ | -- | ५ | ३ | ८ |
| दिव्यांग | एकूण पद १ - अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - १ पद | | | | | | | | | | |
| **(११) सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (एकूण १६ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | १ | -- | १ | -- | १ | ३ | -- | ८ | ८ | १६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | १ | -- | १ | -- | १ | २ | -- | ७ | ६ | १३ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | २ | ३ |
| **(१२) उप अधीक्षक, भूमी अभिलेख, गट-ब (एकूण १ पद)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(१३) उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट- ब (एकूण २ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| **(१४) सहायक आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, गट-ब (एकूण १ पद)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(१५) सहायक प्रकल्प अधिकारी/सांख्यिकी अधिकारी/प्रशासकीय अधिकारी/संशोधन अधिकारी/गृहप्रमुख/प्रबंधक,गट-ब (एकूण ५ पदे)** | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ३ | ५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| *** अनुशेषाचे पद** | | | | | | | | | | | |

**३. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

**३.१** वर नमूद केलेल्या संवर्गातील पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल/वाढ होण्याची शक्यता आहे.

**३.२ महिला व खेळाडूंसाठी असलेले समांतर आरक्षण हे कप्पीकृत (compartmentalised) आहे.**

**३.३** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**३.४** महिला व खेळाडूसाठीचे आरक्षण हे शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**३.५** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अ.जा. व अ.ज. वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**३.६** वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**३.७** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**३.८** प्राविण्य पात्र खेळाडू आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वीचे सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले क्रीडा प्रमाणपत्र प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची क्रीडा विषयक प्रमाणपत्रे योग्य दर्जाची असल्याबाबत व तो खेळाडू उमेदवार कोणत्या संवर्गातील (गट-अ ते गट-ड) खेळाडूसाठी आरक्षित पदाकरीता पात्र ठरतो याविषयीच्या क्रीडा पडताळणीबाबतचा संबंधित विभागीय उपसंचालकांचा अहवाल मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचा अथवा तत्पूर्वीचा असणे आवश्यक आहे.

**३.९** संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय किंवा सक्षम प्राधिका-याकडे प्रमाणपत्रे सादर करताना पात्र खेळाडू उमेदवाराने प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासाठी त्यांना पात्र ठरवणारी आपली खेळाडू विषयक **सर्व प्रमाणपत्रे एकाच वेळी** सादर करणे आवश्यक आहे.

**३.१०** क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदाकरीता पात्र ठरतो याविषयी मुख्य परीक्षेस अर्ज सादर करण्यापूर्वीच्या अंतिम दिनांकाचे अथवा तत्पूर्वीच्या दिनांकाचे सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र मुलाखतीच्यावेळी सादर केले तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशीकरीता विचार करण्यात येईल.

**३.११** प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या पदांच्या बाबतीत खालील पदांसमोर दर्शविलेल्या शारीरिक पात्रतेचे निकष धारण करणारे उमेदवारच संबंधित पदावर नियुक्तीसाठी पात्र अथवा अपात्र असतील :-

| अ.क्र. | पदाचे नांव | शासन आदेश | दिव्यांगत्वाचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | उप जिल्हाधिकारी, गट-अ | शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण-१०९८/प्र.क्र.१४/ई-१ दिनांक २६ सप्टेंबर, २००० | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| २ | तहसिलदार, गट-अ | | |
| ३ | पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट-अ | शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक रापोसे ३०९८/प्र.क्र.२२५/पोल-१-अ, दिनांक २४ नोव्हेंबर, १९९९ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - अपात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - अपात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - अपात्र |
| ४ | सहायक राज्यकर आयुक्त, गट-अ | शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-१०१२/प्र.क्र.२१३/वि.प्र.-४ दिनांक ११ मार्च, २०१६ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ५ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी, गट-अ | शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक मविसे १०/२०१०/ प्र.क्र.३६६/ आस्था-३, दिनांक १४ जानेवारी, २०११ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ६ | सहायक गट विकास अधिकारी, गट-ब | | |
| ७ | सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ | शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संलेको २०१०/प्र.क्र.२६६/कोषा. प्र.-२ दिनांक ३ जानेवारी, २०११ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - अपात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ८ | उद्योग उपसंचालक, तांत्रिक, गट-अ | शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक आयएसटी-२०१०/प्र.क्र.६८२/ उद्योग-३, दिनांक १९ जानेवारी, २०११ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ९ | उपशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब | शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक अपंग-२०१०/(२१९/१०)/असंक, दिनांक २१ जानेवारी, २०११ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| १० | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब | शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एमव्हीडी ०६१५/प्र.क्र.१६३/परि-४, दिनांक २६ जुलै, २०१७ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | कक्ष अधिकारी, गट-ब | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक कअस-१३१५/प्र.क्र.१२०/१४ब दिनांक १६ एप्रिल, २०१६ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| १२ | उप अधीक्षक, भूमी अभिलेख, गट-ब | शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक स ११/२००४/प्र.क्र.१४६/ई-६ दिनांक ९ जुलै, २००८ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| १३ | उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट ब | शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक इएसटी ४०९८/सीआर १५४/इएक्ससी-४, दिनांक १६ फेब्रुवारी, २००९ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - अपात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - अपात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - अपात्र |
| १४ | सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक इएसटी ४०९८/सीआर १५४/इएक्ससी-४, दिनांक १६ फेब्रुवारी, २००९ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| १५ | सहायक प्रकल्प अधिकारी/सांख्यिकी अधिकारी/प्रशासकीय अधिकारी/संशोधन अधिकारी/गृहप्रमुख/प्रबंधक,गट-ब | शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक आस्था-१००२/प्र.क्र.४५/का.१५, दिनांक २० ऑगस्ट, २००५ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - पात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |

**३.१३** इतर पदांच्या बाबतीत दिव्यांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**३.१४** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**३.१५** दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

**३.१६** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ मधील आदेशानुसार SADM या नवीन संगणक प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**३.१७** परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर, मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

**३.१८** अमागास उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अमागास **सर्वसाधारण** पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ आरक्षित प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

**३.१९** कक्ष अधिकारी गट-ब हे पद वगळता इतर पदांकरिता "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह लागू आहेत.

**४. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत**

**४.१** फक्त दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित व किमान ४०% कायमस्वरुपी दिव्यांगत्व असलेल्या पात्र उमेदवारांना, ते लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास, परीक्षा प्रयोजनार्थ गुणवत्तेनुसार आयोगाच्या पूर्व परवानगीने लेखनिकाची मदत घेता येईल व आयोगाच्या पूर्व परवानगीने अनुग्रह कालावधी (Compensatory Time) अनुज्ञेय राहील.

**४.२** प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**४.३** लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: केली जाणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

**४.४** अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

**४.५** परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

**४.६** दिव्यांग व्यक्तींना लेखनिक पुरविण्याबाबत व अनुग्रह कालावधी अनुज्ञेय ठरविण्याबाबत मार्गदर्शक सूचना, विविध अर्जांचे नमुने, विशेष सूचना, संबंधित शासन आदेश इत्यादी बाबी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील "विकलांग (दिव्यांग) व्यक्ती" या सदरामध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, त्यांचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करावे.

**५. वेतनश्रेणी :-**

**५.१** गट-अ - रूपये १५,६००-३९,१०० व नियमांनुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

**५.२** गट-ब - रूपये ९,३००-३४,८०० व नियमांनुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

**६. पात्रता :-**

**६.१** भारतीय नागरिकत्व

**६.२ वयोमर्यादा :-**

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | किमान | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | अमागास / मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | अमागास | मागासवर्गीय | |
| १ एप्रिल, २०१८ | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४८ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |

**६.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**६.४ अर्हता :-**

**६.४.१** उपलब्ध पदसंख्येतील सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ, उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ तसेच सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब या संवर्गातील पदे वगळून इतर पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

**६.४.२** सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ पदासाठी खालीलप्रमाणे अर्हता आवश्यक :-

(१) सांविधिक विद्यापीठाची, किमान ५५ टक्क्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा

(२) इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकाऊंटस ऑफ इंडिया यांनी घेतलेली सनदी लेखापालाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण, किंवा

(३) इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंटस यांनी आयोजित केलेली परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण, किंवा

(४) सांविधिक विद्यापीठाची वाणिज्य मधील पदव्युत्तर पदवी, किंवा

(५) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून वित्त व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञतेसह पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए.)

**६.४.३** उद्योग उपसंचालक (तांत्रिक), गट-अ पदासाठी खालीलप्रमाणे अर्हता आवश्यक :-

(१) सांविधिक विद्यापीठाची, अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील पदवी, किंवा

(२) विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी

**६.४.४** सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब पदाकरिता अभियांत्रिकी शाखेतील किंवा भौतिक शास्त्र व गणित विषयासह विज्ञान शाखेतील पदवी.

**६.४.५** पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत परीक्षेस पात्र असतील, परंतु राज्य सेवा मुख्य परीक्षा- २०१८ च्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१८ करिता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**६.४.६** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यन्त पूर्ण केली असली पाहिजे.

**६.४.७** उमेदवाराला मराठी लिहिता, वाचता, बोलता येणे अत्यावश्यक आहे.

**६.५ शारीरिक मोजमापे/अर्हता :-**

**६.५.१ वरील अर्हतेसोबत खालील संवर्ग/पदांकरीता त्यांच्या समोर दर्शविल्याप्रमाणे उमेदवारांची शारीरिक मोजमापे/अर्हता असणे आवश्यक आहे :-**

**(१) पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ -**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| (१) **उंची** - १६५ **सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)**<br>(२) **छाती - न फुगविता** ८४ **से.मी.**,<br>(३) **फुगविण्याची क्षमता - किमान** ५ **से.मी. आवश्यक** | **उंची** - १५७ **सें.मी.** (**अनवाणी**) (**कमीत कमी**) |

**(२) अधीक्षक, गट-अ व उप अधिक्षक, गट-ब राज्य उत्पादन शुल्क -**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| (१) **उंची** - १६५ **सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)**<br>(२) **छाती - न फुगविता** ७९ **से.मी.**,<br>(३) **फुगविण्याची क्षमता - किमान** ५ **से.मी. आवश्यक** | **उंची** - १५५ **सें.मी.** (**अनवाणी**) (**कमीत कमी**) |

**(३) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब -**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| (१) **उंची** - १६३ **सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)**<br>(२) **छाती - न फुगविता** ७९ **से.मी. (कमीत कमी)**,<br>(३) **फुगविण्याची क्षमता - किमान** ५ **से.मी. आवश्यक**,<br>(४) **चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी असावी आणि रंगांधळेपणा नसावा.** | (१) **उंची** - १६३ **सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)**<br>(२) **चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी असावी आणि रंगांधळेपणा नसावा.** |

**६.५.२** उपरोक्त संवर्ग/पदांसाठी पसंतीक्रम दर्शविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत विहित शारीरिक मोजमापे व शैक्षणिक अर्हता (लागू असेल त्याप्रमाणे) अर्जामध्ये आढळून न आल्यास त्यांच्या पसंतीक्रमाचा संबंधित पदासाठी विचार केला जाणार नाही.

**७. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

**७.१** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**७.१.१** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

**७.१.२** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा

**७.१.३** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा

**७.२** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टीआरएन-०५१४/प्र.क्र.७/१४/१८-ब, दिनांक २४ एप्रिल, २०१५ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार परिविक्षाधीन नियुक्तीवर रुजू होणा-या उमेदवारांस ठराविक रकमेचे बंधपत्र (Bond) देणे आवश्यक राहील.

**७.३** महाराष्ट्र नागरी सेवा (महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या राज्य नागरी सेवा परीक्षेद्वारे गट-"अ" आणि गट-"ब" (राजपत्रित), या पदाकरीता निवड होऊन सरळसेवेने नियुक्त होणा-या व एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण घेणा-या उमेदवारांची सेवा ज्येष्ठता निश्चित करणे) नियम, २०१५ नुसार, निवड झालेल्या उमेदवारांची संबंधित संवर्गातील परस्पर सेवा ज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

**८. प्रमाणपत्र पडताळणी:-**

**८.१** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**८.२** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**८.३** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील.

**८.४** पात्रतेसंदर्भातील अथवा विविध सवलती संदभार्तील विहित नमुन्यातील मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचेवेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.

**९. परीक्षेचे टप्पे - दोन**

प्रस्तुत परीक्षा खालील दोन टप्प्यामध्ये घेण्यात येईल :-

(१) मुख्य परीक्षा गुण - ८००
(२) मुलाखत गुण - १००

**१०. मुख्य परीक्षेकरीता शुल्क (रुपये) : १०.१** :- अमागास - **रु. ५२४/-** **१०.२** :- मागासवर्गीय - **रु. ३२४/-**

**११. अर्ज करण्याची पद्धत** :-

**११.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

**११.२** पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ३० जून, २०१८ ते १६ जुलै, २०१८** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**११.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**११.४** आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

**११.५** आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

**११.६** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**११.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

**११.७.१** शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील '**माझे खाते**' या लिंक वर क्लिक करावे.

**११.७.२** '**माझे खाते**' या लिंक वर क्लिक केल्यानंतर '**माझे अप्लिकेशन**' सदरातील '**स्पर्धात्मक परीक्षा**'या लिंक वर क्लिक करावे.

**११.७.३** '**स्पर्धात्मक परीक्षा**' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. '**Unpaid**' लिहिलेल्या पद/परीक्षेसमोर ' **Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

**११.७.४** '**Pay Now** ' या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

**११.७.५** क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

**११.७.६** नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

**११.७.७** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

**११.७.८** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**११.७.९** विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक १६ जुलै, २०१८** रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**११.७.१०** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक १७ जुलै, २०१८** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**११.७.११** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करुन खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**११.८ केंद्र निवड** :-

**११.८.१** परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता "माझे खाते" मधील संबंधित परीक्षेची निवड करावी. त्यानंतर "केंद्र निवडा" या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. केंद्राच्या क्षमतेइतक्या अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

**११.८.२** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुटटी अथवा रविवारचा असेल, तर सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करता येईल.

**११.८.३** वरीलप्रमाणे केंद्र निवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हा केंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हा केंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आेागाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**११.८.४** केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

**१२. प्रवेशप्रमाणपत्र :-**

**१२.१** प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१२.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२.३** परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतीही **दोन मूळ** ओळखपत्रे तसेच त्यांच्या छायांकित प्रती (दोन वेगवेगळया ओळखपत्रांच्या) सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१२.४** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह कलर प्रिंट मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**१३. परीक्षेस प्रवेश**

**१३.१ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशप्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.**

**१३.२** डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (calculator) इत्यादी प्रकारची साधने/ साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

**१३.३** आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा संबंधित शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**१४. बायोमॅट्रिक पडताळणी :**

**१४.१** निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराच्या बायोमॅट्रिक सत्यापनासाठी **(Genuiness)** डिजिटल स्वरुपात उमेदवारांच्या बोटांचे ठसे आणि/अथवा बुब्बुळाच्या आधारे पडताळणी केली जाईल.

**१४.२** बायोमॅट्रिक पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी त्यांच्या बोटांचे ठसे योग्यरित्या स्वीकारले गेले असल्याची खात्री करावी.

**१४.३** बायोमॅट्रिक पडताळणीवेळी विसंगती आढळून आल्यास उमेदवारी नाकारली जावू शकते. तसेच पडताळणीच्यावेळी उमेदवार अस्सल नसल्याचे **(not genuine)** आढळून आल्यास त्याच्यावरील कायदेशीर कारवाईव्यतिरिक्त उमेदवारी रद्द होवू शकते, शिवाय आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधाची कारवाई होवू शकते. यास्तव, उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या हातावर मेहंदी, शाई, रसायन इत्यादी प्रकारची कोणतीही बाहयवस्तू/पदार्थ लावू नये.

**१४.४** उमेदवारांनी आधार क्रमांक त्यांच्या खात्यात नमूद केले असले तरी काही उमेदवारांनी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लॉक / अनलॉक सुविधेद्वारा त्यांची आधार क्रमांकाशी संलग्नित बायोमेट्रीक माहिती लॉक केली असल्यास त्यांचे परीक्षेच्या वेळी आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) व पर्यायाने बायोमेट्रिक पडताळणी न होण्याची शक्यता आहे. परीक्षेच्या वेळी आधार क्रमांकाच्या आधारे बायोमेट्रिक पडताळणी करण्याकरीता उमेदवारांची आधार संलग्नित बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) असणे आवश्यक आहे. यास्तव, आधार प्रमाणीकरणाकरीता बायोमेट्रिक माहिती लॉक केली असणा-या उमेदवारांनी परीक्षा / मुलाखत / शारिरीक चाचणीस उपस्थित राहण्यापूर्वी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) करुन प्रमाणीकरणाकरीता खुली करावी. अन्यथा परीक्षा / मुलाखतीकरीता उमेदवाराला प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

**१५.** प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**' तसेच "**परीक्षा**" विभागातील ' **राज्य सेवा परीक्षा**' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

**१६.** प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१७.** सविस्तर अधिसूचना आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : ३० जून, २०१८

सुनिल अवताडे
उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.